# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८
# यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय,
# संत तुकारामनगर, पिंपरी – ४११०१८.

**दरमहा एकत्रीत मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात CMO & Shift Duty वैद्यकिय अधिकारी पदे भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरिता दरमहा एकत्रित मानधनावर वैद्यकिय अधिकारी तातडीक सेवा सी.एम.ओ. व वैद्यकिय अधिकारी शिफ्ट डयुटी ही पदे तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने कालावधीकरीता भरावयाची आहेत. त्यांचे पदनाम, पदसंख्या,शैक्षणिक अर्हता,आरक्षण,मानधन, नियम/अटी/शर्ती खालील प्रमाणे नमुद केलेल्या आहेत.

***वैद्यकिय अधिकारी (CMO& Shift Duty) एकूण पदे -13***

| अ.क्र | विभाग निहाय पदाचे नाव व पदनाम | भरावयाची एकूण पदे | अनु.जाती | अनु. जमाती | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमा | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १००% | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | ४८% |
| १ | **वैद्यकिय अधिकारी CMO** | ५ | १ | १ | - | - | - | - | - | - | ३ |
| २ | **वैद्यकिय अधिकारी Shift Duty** | ८ | १ | १ | १ | - | - | - | - | १ | ४ |
| | **एकूण** | १३ | २ | २ | १ | ० | ० | ० | ० | १ | ७ |

**मुलाखात दि.०१/१०/२०१८**

**वरील पदांना आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता व त्यानुसार द्यावयाचे मानधन खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक पात्रता | मानधन प्र.महिना र.रू. |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी (CMO) | 1) मान्यता प्राप्त विद्यापिठाकडील MBBS पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक. 2) महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलकडील नोंदणी बंधनकारक्‍यावत असणे . .आवश्यक | ५५०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | **वैद्यकिय अधिकारी**<br><br>**(Shift Duty)** | 1) मान्यता प्राप्त विद्यापिठाकडील MBBS पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>2) महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलकडील नोंदणी आवश्यक | पाच वर्षापेक्षा जास्त अनुभव र.रू.५००००/-<br><br>पाच वर्षापर्यंत अनुभव र.रू.४५०००/- |

**अटी व शर्ती-**

१.मानधनावरील नेमणुका पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायमपदी

नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

२. ज्या दिवशी म.न.पास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांची मानधनावरील

सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

३. लेखी परिक्षेस व मुलाखतीस येण्या-जाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

४. उपरोक्त पदांना विहित केलेनुसार तसेच शैक्षणिक अर्हता व कामाच्या अनुभवानुसार मानधन अदा केले जाईल. अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निर्दशनात आलेस तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.

५. सर्व उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी उपस्थित राहताना शैक्षणिक अर्हता,जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या सत्य प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशीट) सर्टिफिकेट, फोटो, इतर सादर करणे बंधनकारक आहे.

६. निवड केलेल्या उमेदवारांना म.न.पा.ने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणुक रद्द करण्यात येईल.

७. सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहील.

८. वरिष्ठ व कनिष्ठ निवासी यांना २४ तास रूग्णालयात राहुनकाम करावे लागेल.ज्या युनिटमध्ये किंवा वॉर्डामध्ये नेमणुक होईल त्यांचे अधिपत्याखाली काम करावे लागेल.

**<u>मुख्य अटी खालील प्रमाणे राहतील-</u>**

- उमेदवारांना रूग्णालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.
- उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पगार अदा केला जाणार नाही.

- उमेदवारांना वयाची अट लागु राहणार नाही.

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदांकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय संत तुकारामनगर पिंपरी येथील चाणक्य प्रशासकीय कार्यालयातील हॉलमध्ये दि.०१/१० /२०१८ रोजी स.१०.०० वाजता आवश्यक त्या कागदपत्रांच्या मुळ प्रती व साक्षांकित केलेल्या प्रतीसह समक्ष उपस्थित रहावे. तसेच आलेल्या इच्छुक उमेदवारांचे रजिस्ट्रेशन सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत केले जाईल. वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. रजिस्ट्रेशन झालेल्या उमेदवारांना सदर पदासाठी घेतल्या जाणा-या लेखी परीक्षा व मुलाखतीबाबत समक्ष सुचना दिल्या जातील व त्याबाबतचा तपशील महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल. सदर दिवशी आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास वरील पद भरेपर्यंत दर सोमवारी Walk In Interview आयोजित केल्या जातील. यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही.

जाहीरात क्र. ब-३
रोटेशन क्र.- ब- २३१
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/७/कावि/५०४/ २०१८
दि.- १९ /०९/२०१८.

सही/-
**अति. आयुक्त (१)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.